# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

## सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०२४

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - २६

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- १,०३,०९,४७,४८,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ६३९४ | १० | राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी चंद्रपूर अंतर्गत १५ व्या वित्त आयोगात जिल्हयातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी जिल्हयातील सर्व नगरपरिषद व गरपंचायत स्त्रावर शहरी आरोग्यवर्धीनी केंद्र स्थापन करण्यात आले आहे.तसेच जिल्हयाला भद्रावती, राजूरा, ब्रम्हपूरी, वरोरा, गोंडपिपरी, सिंदेवाही, जिवती, चंद्रपूर, नागभीड, कोरपना, चिमूर, पोंभुर्णा, मूल असे एकूण १३ तालुक्याकरिता Block Public Health Units (BPHU) उभारण्याकरिता शासनाने मंजूरी दिलेली आहे. या Block Public Health Units (BPHU) करिता लागणारे वैघकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यासह सर्व पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी दिंनाक १५ डिसेंबर २०२३ रोजी जाहिरात प्रकाशित करून त्या प्रमाणे भरती प्रक्रियाव्दारे लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी परीक्षा, कागदपत्र व्हेरिफिकेशन पूर्ण करण्यात आले आहे, पात्र उमेदवारांची निवड यादी जाहिर करतांना अनेक उमेदवारांचे नाव डबल देण्यात आले असल्याने निवड सुचित पात्र उमेदवारांचे क्रमांक मागे गेल्याने त्यांच्यावर अन्याय होण्याची भिती निर्माण झालेली आहे. तसेच भरती प्रक्रिया पुर्ण करण्यात आले असतांना सुध्दा अघापही निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात विलंब होत असणे उपरोक्त जाहिराती नुसार घेण्यात आलेल्या वैघकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यासह सर्व पात्र उमेदवारांना तातडीने नियुक्ती पत्र देऊन त्यांची पदस्थापना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६३९६ | १० | राष्ट्रीय आरोग्य अभियान अतंर्गत राज्यातील ग्रामीण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, जिल्हा रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात दरवर्षी एक दिवसाचे खंड करून कंत्राटी पध्दतीने मानधनावर आयुष वैघकीय अधिकाऱी व कर्मचारी यांच्या नेमणूका १५ ते २० वर्षापुर्वी करण्यात आलेली आहे. या सर्व आयुष वैघकीय अधिकाऱी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिंनाक १४ मार्च २०२४ च्या परिपत्रकानुसार सेवा ज्येष्ठतेनुसार कायम करण्याचा निर्णय घेण्यात आले आहे. या परिपत्रकानंतर आयुष वैघकीय अधिकाऱी व कर्मचाऱ्यांना सेवा समावेशन करण्यासंदर्भात अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिंनाक १९ जून २०२४ रोजी बैठक घेण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | येऊन त्यात सेवा ज्येष्ठता वगळून कौशल्य चाचणी घेणे बाबतच्या निर्णय घेण्यात आलेला असून याची तातडीने अमलबजावणी करण्यासाठी संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. सेवा ज्येष्ठता वगळून कौशल्य चाचणी घेण्याचा निर्णय हा १५ ते २० वर्षापासून काम करणाऱ्या आयुष वैघकीय अधिकाऱी व कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारा असल्यामुळे हा निर्णय रदद करण्यात यावे याबाबत क्राती आयुष वैघकीय अधिकारी संघटना आयुश्य महाराष्ट्र यांनी आरोग्य मंत्री यांच्याकडे निवेदन केली आहे. तरी सुध्दा उपरोक्त निर्णय रदद करण्यात आलेला नसल्यामुळे आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांत पसरत असलेले तीव्र असंतोष व भितीचे वातवरण परिणामी सेवा ज्येष्ठता वगळून कौशल्य चाचणी घेणे बाबतच्या निर्णय रदद करून सेवा जेष्ठतेनुसार आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचारी यांना कायम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६३९८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैघकीय अधिकाऱ्यांचे रिक्त जागा भरून तातडीने रूग्णाची सेवा व्हावी यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या मार्फतीने जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात वैघकीय अधिकारी या पदावर अकरा महिन्याच्या बॉण्डवर BAMS या पदवी प्राप्त डॉक्टरांना घेण्यात आले आहे. मात्र या वैघकीय अधिकाऱ्यांचे हजेरी पत्रक दरमहिन्याच्या १६ ते २० तारखेला जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांना सादर करण्यात येत असते. तरी सुध्दा या वैघकीय अधिकाऱ्यांचे दोन ते तिन महिन्यानंतर वेतन देण्यात येत असल्यामुळे आर्थिकदृष्टया गैरसोईचे आहे. जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात MBBS डॉक्टर उपलब्ध होत नसल्यामुळे मोठया प्रमाणात वैघकीय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त राहत होते. त्यामुळे या रिक्त पदावर BAMS या पदवी प्राप्त डॉक्टरांना घेण्यात येत असून त्यांचे सुध्दा वेतन दरमहिन्यात न मिळणे, तरी चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैघकीय अधिकारी या पदावर अकरा महिन्याच्या बॉण्डवर BAMS या पदवी प्राप्त डॉक्टरांचे वेतन दर महिन्यात ठराविक तारखेला होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुभाष धोटे** |
| (४) | ६३७० | १० | राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी चंद्रपूर अंतर्गत १५ व्या वित्त आयोगात जिल्हयातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी जिल्हयातील सर्व नगरपरिषद व गरपंचायत स्त्रावर शहरी आरोग्यवर्धीनी केंद्र स्थापन करण्यात आले आहे.तसेच जिल्हयाला भद्रावती, राजूरा, ब्रम्हपूरी, वरोरा, गोंडपिपरी, सिंदेवाही, जिवती, चंद्रपूर, नागभीड, कोरपना, चिमूर, पोंभुर्णा, मूल असे एकूण १३ तालुक्याकरिता Block Public Health Units (BPHU) उभारण्याकरिता शासनाने मंजूरी दिलेली आहे. या Block Public Health Units (BPHU) करिता लागणारे वैघकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यासह सर्व पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी दिंनाक १५ डिसेंबर २०२३ रोजी जाहिरात प्रकाशित करून त्या प्रमाणे भरती प्रक्रियाव्दारे लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी परीक्षा, कागदपत्र व्हेरिफिकेशन पूर्ण करण्यात आले आहे, पात्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उमेदवारांची निवड यादी जाहिर करतांना अनेक उमेदवारांचे नाव डबल देण्यात आले असल्याने निवड सुचित पात्र उमेदवारांचे क्रमांक मागे गेल्याने त्यांच्यावर अन्याय होण्याची भिती निर्माण झालेली आहे. तसेच भरती प्रक्रिया पुर्ण करण्यात आले असतांना सुध्दा अघापही निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात विलंब होत असणे, उपरोक्त जाहिराती नुसार घेण्यात आलेल्या वैघकीय अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यासह सर्व पात्र उमेदवारांना तातडीने नियुक्ती पत्र देऊन त्यांची पदस्थापना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६३७१ | १० | राजुरा (जिल्हा चंद्रपूर) मतदार संघातील जिवती तालुका हा डोंगराळ व आदिवासी बहुल तालुका असुन जिल्ह्याचे ठिकाणापासुन १०० किमी अंतरावर आहे. तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा होण्यासाठी तालुका मुख्यालय असलेल्या जिवती येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयास दिनांक १७ जानेवारी २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली. या मंजूर झालेल्या ग्रामीण रूग्णालय इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. हे ग्रामीण रुग्णालय सुरू करणेसाठी आवशक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करूण देण्याकरिता पद निर्मिती व पद भरतीचा प्रस्ताव सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये राज्य स्तर मुंबई यांचे कार्यालयाकडून प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य 3) मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयाकडे दिनांक ०२/०५/२०२३ रोजी फेर सादर करण्यात आलेला आहे. मात्र ग्रामीण रूग्णालय जिवती येथे आकृतीबंधनुसार पद निर्मितीस अद्यापी मंजुरी न मिळाल्याने ग्रामीण रुग्णालय तातडीने सुरू करण्यास विलंब होत असल्याने परिसरातील नागरिकात पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी तातडीने आकृतीबंधानुसार पद निर्मिती व पदभरतीच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६३७२ | १० | राष्ट्रीय आरोग्य अभियान अतंर्गत राज्यातील ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, जिल्हा रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात दरवर्षी एक दिवसाचे खंड करून कंत्राटी पध्दतीने मानधनावर आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणूका १५ ते २० वर्षापुर्वी करण्यात आलेली आहे. या सर्व आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनाक १४ मार्च २०२४ च्या परिपत्रकानुसार सेवा ज्येष्ठतेनुसार कायम करण्याचा निर्णय घेण्यात आले आहे. या परिपत्रकानंतर आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा समावेशन करण्यासंदर्भात अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिंनाक १९ जून २०२४ रोजी बैठक घेण्यात येऊन त्यात सेवा ज्येष्ठता वगळून कौशल्य चाचणी घेणे बाबतच्या निर्णय घेण्यात आलेला असून याची तातडीने अमलबजावणी करण्यासाठी संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. सेवा ज्येष्ठता वगळून कौशल्य चाचणी घेण्याचा निर्णय हा १५ ते २० वर्षापासून काम करणाऱ्या आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारा असल्यामुळे हा निर्णय रदद करण्यात यावे याबाबत क्राती आयुष वैघकीय अधिकारी संघटना आयुश्य महाराष्ट्र यांनी आरोग्य |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मंत्री यांच्याकडे निवेदन केली आहे. तरी सुध्दा उपरोक्त निर्णय रदद करण्यात आलेला नसल्यामुळे आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांत पसरत असलेले तीव्र असंतोष व भितीचे वातवरण परिणामी सेवा ज्येष्ठता वगळून कौशल्य चाचणी घेणे बाबतच्या निर्णय रदद करून सेवा जेष्ठतेनुसार आयुष वैघकीय अधिकारी व कर्मचारी यांना कायम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६३७३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैघकीय अधिकाऱ्यांचे रिक्त जागा भरून तातडीने रूग्णाची सेवा व्हावी यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या मार्फतीने जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात वैघकीय अधिकारी या पदावर अकरा महिन्याच्या बॉण्डवर BAMS या पदवी प्राप्त डॉक्टरांना घेण्यात आले आहे. मात्र या वैघकीय अधिकाऱ्यांचे हजेरी पत्रक दरमहिन्याच्या १६ ते २० तारखेला जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिशद चंद्रपूर यांना सादर करण्यात येत असते. तरी सुध्दा या वैघकीय अधिकाऱ्यांचे दोन ते तीन महिन्यानंतर वेतन देण्यात येत असल्यामुळे आर्थिकदृष्टया गैरसोईचे आहे. जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात MBBS डॉक्टर उपलब्ध होत नसल्यामुळे मोठया प्रमाणात वैघकीय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त राहत होते. त्यामुळे या रिक्त पदावर BAMS या पदवी प्राप्त डॉक्टरांना घेण्यात येत असून त्यांचे सुध्दा वेतन दरमहिन्यात न मिळणे, चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैघकीय अधिकारी या पदावर अकरा महिन्याच्या बॉण्डवर BAMS या पदवी प्राप्त डॉक्टरांचे वेतन दर महिन्यात ठराविक तारखेला होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (८) | ६३४७ | १०० | पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर तब्बल १० वर्षांनी २१० कोटी रुपये खर्चाचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याचा निर्णय शासनाने जाहीर करणे, मात्र या रुग्णालयाच्या बांधकामाला निधीची कमतरता भासत असल्याने रुग्णालयाचे बांधकाम ठप्प झालेले असणे, जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याच्या कामाची मुदत डिसेंबर २०२४ मध्ये संपत असून निधी अभावी हे काम रखडलेले असणे, त्यामुळे पालघर जिल्ह्यातील नागरिकांना विविध आजाराच्या उपचारासाठी मुंबई, ठाणे, केंद्रशासित सेलवासा आधी ठिकाणी जावे लागत असल्याने जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड बसत असणे, रुग्णांचे सतत प्रचंड हालअपेष्टा होत असणे, पालघर जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (९) | ६५१५ | १० | मुंबईमध्ये नामांकित रूग्णालयामधील एक रुग्णालय सर जे.जे. ग्रुप रुग्णालय असणे, या रुग्णालयात अनेक सोयी सुविधांचा अभाव असणे, या रुग्णालयात औषधांचा तुटवडा असणे, सिटी स्कॅन मशीन एम.आर.आय मशीन बंद असणे, रुग्णांना औषधे बाहेरून घेण्यासाठी भर दिला जाणे, बहुतांश वैद्यकीय चाचण्या बाहेरून करून घेतल्या जाणे, ऑपरेशन थियेटर मागील काही काळापासून बंद असल्याची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | धक्कादायक बाब समोर येणे, रुग्णालयात सी टी स्कॅन करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या तारखा देण्यात येणे, त्यामुळे रुग्णांचे वेळेत उपचार न होणे, महापलिकेच्या नायर रुग्णालयात देखील रुग्णांचे हाल होत असणे, त्याचप्रमाणे कामा रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, जी. टी. रुग्णालय येथे देखील औषधांचा तुटवडा निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त असणे, परिणामी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची व उपाययोजना. |
| (१०) | ६५१६ | १० | राज्यातून क्षयरोग हद्पार करण्यासाठी राज्य सरकारकडून मोठया प्रमाणात उपाययोजना करत असताना राज्यभरात क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याची बाब माहे मे-२०२४ च्यासुमारास निदर्शनास येणे, मागील दीड महिन्यांपासून नांदेड शहरात या औषधांचा तुटवडा झाल्याने सुमारे तीन हजारांपेक्षा अधिक रुग्ण या क्षयरोगाच्या उपचारापासून वंचित राहिल्याची बाब समोर येणे, ही परिस्थिती राज्यातील इतर भागात असणे, सरकारी औषध मिळत नसल्यामुळे रुग्णांना बाहेरील औषधांचा आधार घ्यावा लागत असल्याने आर्थिक नुकसान सहन करावा लागत असणे, औषधांच्या तुटवडयामुळे क्षयरोग वाढण्याची भिती निर्माण झाल्याने शासनाने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (११) | ६४४३ | १० | राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी, वस्तु खरेदी प्राधिकरण, आरोग्य भवन, मुंबई यांचेतर्फे राष्ट्रीय क्षय रोग निवारण कार्यक्रमांतर्गत क्षय रोग कक्षास अवश्यक असलेले अल्ट्रा पोर्टेबल हँडलेड, डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदी करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत (नि.क्र.GEM/२०२४/B/४९०१९८३) जाचक अटी टाकून मध्य प्रदेश सरकारने काळ्या यादीत टाकलेल्या व निकृष्ट दर्जाच्या मशीनरी पुरविणाऱ्या आपल्या मर्जितील इदुसॉफ्ट हेल्फ केअर प्रा.लि. या कंपनीस कंत्राट देण्याचे आदेश काढण्यात येत असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, मर्जितीली कंपनीला कंत्राट देण्यासाठी सदरहू निविदेत मशीन अंतर्गत स्टोरेजचे १२०० इमजेस करणारी बाजारात कोणतीही मशीन उपलब्ध नसणे, आऊटपूटमध्ये ९० केव्ही किंवा १२० केव्ही मशीनचा फॉरमॅट असताना निविदेत ८० केव्हीचे फॉरमॅट टाकणे आदि जाचक अटींचा समावेश करण्यात येणे, या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२५.०५.२०२४ रोजी डावलण्यात आलेल्या कंपनीने लेखी तक्रार निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, या अगोदर वैद्यकीय शिक्षण विभागाने देखील २३ लाखाची मशीन ५८ लाख इतक्या दुप्पट दराने दोन मशीनी खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, सदरबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता" |
| (१२) | ६४४४ | १० | "मुंबई भायखळा येथील सर जे.जे. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील ११ विभागाच्या प्रमुखांनी शासन परवानगी न घेता बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये ६ कोटी रुपयाहून अधिक निधी जमा करुन या निधीतून डॉक्टरांनी परदेशवारी, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | हॉटेलची बीले, वैद्यकीय उपकरणे खरेदी करुन गैरप्रकार व आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी वैद्यकीय शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर करण्यात येऊनही अद्याप या प्रकरणातील दोषी डॉक्टरांविरुद्ध शासनातर्फे कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, उक्त प्रकरणात ११ विभागाच्या डॉक्टरांनी किमान १२ कोटी रुपये इतका निधी जमा केला असताना कागदोपत्री ६ कोटी रुपये निधी जमा केल्याचे दर्शविण्यात येणे यापैकी २ कोटी ७५ लाख रुपये डॉक्टरांनी खर्च केले असून उर्वरित रक्कम ३ कोटी २५ लाख रुपये अद्यापही डॉक्टरांनी शासनाच्या कोषागरात जमा केली नसल्याची धक्कादायक बाब उघड होणे, सदरहू प्रकरणात शासनाच्या नावे बँकेत बेकायदा खाते उघडणे व विविध नावाने बेकायदा पैसे खात्यात जमा करणे हा कायदेशीर गुन्हा असतानाही शासनाच्या उच्च पदस्थांनी सदरहू डॉक्टरांना कारवाईपासून वाचविण्याकरिता समिती स्थापन करण्याची औपचारिकता पूर्ण करुन सदरहू आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार दडपून टाकल्याचा उघडकीस आलेला गैरप्रकार, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६४४७ | १० | राज्याच्या आरोग्य विभागाने रुग्णवाहिकेचा पुरवठा करण्यासाठी सुमित आणि बीव्हीजी या दोन कंपन्यांना वाढीव दराने टेंडर मंजूर करुन यामध्ये सुमारे ६५०० कोटी रुपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचा धक्कादायक प्रकार दि.०२.०४.२०२४ रोजी उघडकीस येणे, उक्त रुग्णवाहिका खरेदी प्रकरण निविदा घोटाळा प्रकरणाची राज्य शासनाने सखोल चौकशी केली आहे काय? चौकशीचे निष्कर्ष काय आहेत ? किती रुग्णवाहिकांच्या खरेदीमध्ये निविदा रक्कमेत वाढ करुन आर्थिक घोटाळा केल्याचे निष्पन्न झाले असणे, चौकशीच्या निष्कर्षानुसार शासनाने संबंधित दोषी अधिकारी आणि संगनमत करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनाविरुद्ध शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१४) | ६५०८ | १० | गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य सेविकांची ३०० व आरोग्य सेवकांची १२७ पदे रिक्त असल्याचे तसेच वैद्यकीय अधिकारी (गट अ), वैद्यकीय अधिकारी (गट ब व क) अशी एकूण जवळपास १२० पदे रिक्त असणे, तसेच जिल्ह्यात आकृतीबंधानुसार आरोग्य सैनिकच नसल्यामुळे यासंबंधी तातडीने पदभरती करण्यात यावी, असे पत्र लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री व सार्व.आरोग्य मंत्री यांना माहे एप्रिल/मे, २०२४ मध्ये दिलेले असणे, जिल्ह्यातील गोरगरीब रूग्णांवर तातडीने योग्य ते उपचार होण्यासाठी रिक्त असलेली सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, जिल्ह्यातील अनेक आदिवासी लहान मुले, महिला, नागरिक हे उपचारासाठी दाखल होत असणे, परंतू वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या व गट अ ते क च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे तातडीने भरणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१५) | ६५१० | १० | केंद्र शासनाने २०२५ पर्यंत क्षयरोग निर्मूलन करण्याचे ध्येय ठेवले असताना महाराष्ट्रात मात्र सन २०२३ मध्ये जवळपास २ लाख २७ हजार ६४६ तर २०२४ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत ३३ हजार ६७५ क्षयरोग रूग्णांची नोंद झाली असून लोकप्रतिनिधींनी क्षयरोग मुक्तीसाठी माहे एप्रिल/मे, २०२४ मध्ये तातडीने ठोस उपाययोजना करण्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा. सार्व. आरोग्य मंत्री यांना दिलेले असणे, यासंदर्भात तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच औषध तुटवड्यावर मात करण्यासाठी केंद्रीय क्षयरोग विभागाने १८ मार्च, २०२४ रोजी राज्यातील क्षयरोग अधिकाऱ्यांना पत्र पाठवून स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याची परवानगी दिलेली असणे, हा संसर्गजन्य आजार असून छातीतील टीबी बरोबरच मेंदू, पाठीचा कणा, मानेत येणारी गाठ, डोळा या ठिकाणी देखील संसर्ग होऊ शकत असणाऱ्या क्षयरोगाच्या औषधांचा औषध केंद्रांमध्ये तुटवडा असल्याने तातडीने दूर करण्यासाठी शासनाकडून कार्यवाही होणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१६) | ६३३३ | १० | मुंबई उपनगर मालाड (पश्चिम) जनकल्याण नगर, भूमि पार्क येथे शासनाचे सामान्य रुग्णालय मालवणी असणे, सदरच्या ठिकाणी शासनाने रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी रुग्णांना अत्यावश्यक सेवा देता यावी, यासाठी रुग्णालयाच्या आवारात अधिकारी व कर्मचारी यांचे करिता निवासस्थानाची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधली असणे, मात्र सदरची इमारत कर्मचाऱ्यांना निवासस्थानासाठी उपलब्ध झाली नसणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी इमारत उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ६३३४ | १० | कामा रुग्णालय, मुंबई येथील रुग्णालयात शासनाने डॉक्टर,नर्स व इतर कर्मचा-यांवर मोबाईल, फेसबुक, इंस्टाग्राम, युटयूब रिल्स बघण्यावर बंद घातली असणे, मोबाईलच्या नादात रुग्णाकडे दुर्लक्ष होत असणे, यासाठी शासनाने त्याच धर्तीवर सर्व रुग्णालयासाठी धोरण ठरविण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (१८) | ६३३५ | १० | देशात व राज्यात कोविड- १९ चा साथीच्या रोगाचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाला असणे, कोविड- १९ या साथीच्या रोगात मोठया प्रमाणावर लोक मृत्युमुखी पडले व केंद्र शासनाने देशातील कोविड- १९ या साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, महामारी कायदा- १८५७ च्या मधील तरतूदी लागू केल्या असणे, महामारी रोखण्यासाठी व कोविड- १९ या साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने डॉक्टर, नर्सेस, कामगार कर्मचा-यांच्या नेमणूका केल्या असणे, मात्र त्यांना सेवेत काम केले नसणे, त्या सर्वांना शासन सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली, डॉक्टर, नर्सेस, शिपाई व कामगारांना सेवेहून कमी केले असणे, त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात यावे अशी मागणी केली असणे, कोविड योद्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, कोविड योद्धांत व स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व तातडीची उपाययोजना. |
| (१९) | ६३३६ | १० | रायगड जिल्ह्यात सन २०२० च्या करोना संकटकाळात रायगड जिल्हा परिषदेने अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रिडा संकुलाच्या इमारतीचा वापर करुन त्याचे थकीत भाडे व वीज बीला पोटी ३३ लाख ५३ हजार ४९४ रुपये मागील तीन वर्षापासून जिल्हा क्रिडा विभागाला मिळाले नसल्याचे दि. २९ मे २०२४ वा त्यादरम्यान उघडकीस येणे, रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे नेहुलीच्या जिल्हा क्रिडा संकुलामध्ये आवश्यक ते बदल करुन रुग्णखाटा व कोवीडचे विविध साहित्य ठेवण्यासाठी तोडफोड केल्याने खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असणे, माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये जिल्हा क्रिडा विभागाने आरोग्य विभागाला पत्र लिहून तसेच दि. १९ नोव्हेंबर, २०२३ रोजी पत्राद्वारे स्मरण करुनही क्रिडा संकुलाला भाडे देण्यात आलेले नसणे, त्यामुळे संकुलाची देखभाल दुरुस्ती लाईट बील कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत असल्याने क्रिडा संकुल प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ६३३७ | १० | ’राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समावेशनाबाबत विविध संघटनांशी मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केलेली असणे, त्यामध्ये आरोग्य विभागामध्ये दरवर्षी रिक्त होणाऱ्या पदावर भरण्यात येणाऱ्या कोट्यापैकी सरळसेवेने ७० टक्के व उर्वरीत ३० टक्के पदावर राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत किमान १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेले कर्मचारी यांची भरती करणे, यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याकरीता वयाची अट शिथिल करणे, तसेच आरोग्य विभागातील नियमित पदांकरीता सेवाप्रवेश नियमांमध्ये आवश्यक ते बदल करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असणे, त्यानुसार आयुक्त आरोग्य सेवा यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असणे, प्रस्तावानुसार आरोग्य विभागातील मंजूर पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये दुरुस्ती करुन ७० टक्के पदे सरळसेवेने व ३० टक्के पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतील कंत्राटी कर्मचाऱ्यामधून समायोजनाने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, १० वर्षापेखा जास्त सेवा दिलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ६३३९ | १० | मुंबई मध्ये २०२३ या वर्षात जन्मलेल्या हजार मुलांमागे (० ते ५) वयोगटातील २६ मुलांचा मृत्यू झाल्याचे समोर येणे, डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार मुलांचे मृत्यू होण्याची कारणे मुदतपुर्व प्रसुती, न्युमोनिया, कावीळ व गॅस्ट्रो ही असून, शाश्वत विकास ध्येय अंतर्गत २०३० पर्यंत मुंबई मधील मातामृत्यू दर प्रतिहजार ७० आणि बालमृत्यूदर प्रतिहजार २५ पेक्षा कमी करण्याचे लक्ष ठेवण्यात येणे, आरोग्य विभागाकडून मिळालेल्या आकडेवारी नुसार २०२३ मध्ये मातामृत्यू दर हजारांमागे ६८ होता, परंतू अद्याप बालमृत्यूचा दर कमी करण्यासाठी शासनाला यश आलेले नसणे, मागील पाच वर्षांत मुंबईतील दर हजार मुलांमागे २०१९ मध्ये २८, २०२० मध्ये २६, २०२१ मध्ये २८, २०२२ मध्ये २७ आणि २०२३ मध्ये २६ बालमृत्यू |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | झालेले असणे, याबाबत शासनाने माहिती घेतली असता मृत्यूमुखी पडलेल्या मुलांचे पालक त्यांना नियमितपणे लसीकरण करत नसल्याची बाब समोर येणे, याबाबत पालकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे असून शासनाने लसीकरणाची मोहिम प्रभावी राबविणे गरजेचे असणे, प्रशासनाच्या अशा हलगर्जीपणामुळे बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ६३४० | १० | राज्यातून क्षयरोग हद्दपार करण्यासाठी राज्य सरकार मोठ्या प्रमाणात उपाययोजना करत असताना राज्यभरात क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा माहे एप्रिल, २०२४ पासून निर्माण होणे, नांदेड तसेच इतर राज्यात क्षयरोगाच्या उपचारापासून क्षयरुग्ण वंचित असल्याचे दिसून येत असणे, नांदेड शहरात सरकारी इस्पितळात क्षयरोग रुग्णांना ३-एफडीसी ए ही औषधे मिळत नसल्याने रुग्णांना बाहेरील औषधांचा आधार घ्यावा लागणे, औषधे न मिळाल्यास बहु औषधे-प्रतिरोधक क्षयरोग (एमडीआर टीबी) वाढवण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात असल्यामुळे क्षयरोगाच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण होणे, तर काही ठिकाणी पर्यायी लुज मेडीसीनचा उपयोग केला जात असणे, त्यामुळे क्षयरोग रुग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ खासगी विक्रेत्याकडेही औषधे मिळत नसल्याने क्षयरोग रुग्णांची होत असलेली गैरसोय, टाळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ६३४१ | १० | मीरा-भाईदरमध्ये झपाट्याने वाढत असलेली लोकसंख्या त्यातच एकमेव असलेले शासकीय रुग्णालय त्यात सुध्दा वैद्यकीय सुविधा आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा अभाव, वैद्यकीय साधनांची कमतरता यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय, भाईदर पश्चिमेचे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयच व्हेंटिलेटरवर असल्याची स्थिती उद्धवणे. मीरा-भाईदर शहरात भारतरत्न पंडित भीमसेन जोशी या शासकीय रुग्णालयात आवघ्या २०० खाटा असणे, यासाठी शासन मंजूर ३६५ डॉक्टर व कर्मचारी कार्यरत असणे, शासनाच्या महात्मा फुल जनआरोग्य योजनेसह इतर अनेक योजनांचा लाभ रुग्णांना उपलब्ध आहे. राज्य शासनाच्या मोफत बैद्यकिय चाचणी जसे की ईसीजी, क्ष-किरण, सी.टी.स्कॅन, रक्त तपासणी यांसह मोफत औषधाची सुविधा उपलब्ध असणे, परंतु, वैद्यकीय साधनांची कमतरता, वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा अभाव यामुळे यातील एकही सुविधा सुरळीत नसणे, रुग्णालयात प्रशासनाकडून राज्य सरकारकडे पुरेशा आर्थिक निधीची तसेच, रिक्त पदे भरण्यासाठी मागणी करुनही त्याची पूर्तता न होणे. त्यामुळे रुग्णांचे आणि भागातील नागरिकांचे औषधोपचाराविना प्रचंड हाल होणे. मिरा-भाईदर भागातील नागरीक शासकीय योजनांच्या लाभांपासून वंचित रहाणे, अपूऱ्या अधिकारी/कर्मचारी वर्गामुळे सरकारी दवाखान्यात वेळेवर औषधोपचार मिळत नसल्याने नागरीकांना खाजगी रुग्णालयात नाईलाजास्तव जावे लगणे, याचा गरीब सामान्य जनतेला औषधोपचारासाठी विनाकारण पडणारा आर्थिक भूर्दड, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२४) | ६३४२ | १० | सिंधुदुर्ग जिल्ह्यात सिंधुदुर्गनगरी येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रे अशी मोठी आरोग्य यंत्रणा असणे, सिंधुदूर्ग जिल्हा हिवताप विभागामध्ये 'जिल्हा हिवताप अधिकारी' या प्रमुख पदासह आरोग्य सेवकांची ४० पदे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ ३५ पदे, आरोग्य सहायक २० पदे तसेच, फिल्ड वर्कर ५ पदे अशी तब्बल ९४ पदे गेली तीन वर्षे रिक्त असणे, सदरची पदे भरण्यासाठी राज्य शासनाने मंजूरी दिलेली असून पदे भरण्याबाबत परीक्षेची प्रक्रियाही पूर्ण करण्यात येवूनही सार्व.आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी, हलगर्जी कारभाराने अद्यापपर्यन्त रिक्त पदे न भरणे, सिंधुदूर्ग जिल्हयातील या रिक्त पदांमुळे हिवताप, लेप्टो, डेंग्यु, श्वाईन फ्लू, माकड ताप साथीच्या आजारांवर येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये या भागातील जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध न होणे, वेळेवर औषधोपचार न झाल्याने बहुसंख्य रुग्ण मृत्युमूखी पडणे, अपूऱ्या अधिकारी/कर्मचारी वर्गामुळे सरकारी दवाखान्यात वेळेवर औषधोपचार मिळत नसल्याने नागरीकांना खाजगी रुग्णालयात नाईलाजास्तव जावे लगणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ६३४३ | १० | सिंधुदूर्ग जिल्ह्यात सिंधुदूर्गनगरी येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील ३८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, आरोग्यवर्धिनी केंद्रे अशी मोठी आरोग्य यंत्रणा असून वैद्यकीय अधिकारी, अन्य कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणातील पदे रिक्त असणे, शासनाकडून आवश्यक साधनसामुग्रीचा पुरवठा न होणे, औषधांचा कमी पुरवठा, नादुरुस्त रुग्णवाहिका अशा अनेक समस्यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा त्रस्त असणे, परिणामी, दरवर्षी लक्षावधी रुपयांचा निधी खर्च होऊनही नागरिकांना पुरेशी आरोग्य सुविधा न मिळणे, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयांमधील वर्ग-1 व वर्ग-२ च्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मोठया प्रमाणात रिक्त असलेल्या जागा प्राधान्याने भरणे, जिल्हयातील विविध रुग्णालयात रिक्त असलेल्या परिचारिका व अन्य पॅरामेडिकल कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे सिंधुदूर्ग जिल्हयातील अंशकालीन स्त्री परिचर, बालवाडीताई यांना प्रशिक्षण देवून त्यांच्या पदांमधून भरणे. तसेच, शासनाची अतिशय उपयुक्त, लोकप्रिय झालेली महात्मा फुले जन आरोग्य योजना ग्रामपातळीवर गावातील ग्रामसेवक, आरोग्य सेविका, तलाठी यांच्या मध्यमातून ग्रामपातळीपर्यन्त पोहोचविण्यात यावी अशी 'सिंधुदूर्ग आरोग्य मिशन' या सामाजिक संस्थेची मागणी असणे, सिंधुदूर्ग जिल्हयासाठी बीव्हीजी खाजगी कंपनीकडून १०८ रुग्णवाहिकांची पुरविण्यांत येणारी सेवा ठीसाळ, मनमानी, बेभरवश्याची असणे, रुग्णवाहिकांवर काम करणारे वैद्यकीय अधिकारी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आर-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ५,८४,५३,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२६) | ६५०९ | १० | मुदतपूर्व जन्मलेल्या व कमी वजनाच्या नवजात शिशुंवर वेळेत उपचार होऊन त्यांचा जीव वाचविण्यासाठी आवश्यक असलेली बेबी वॉर्म मशीन राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देण्याबाबतचे पत्र लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल/मे, २०२४ मध्ये मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री व सार्व. आरोग्य मंत्री यांना दिलेले असणे, यासंबंधी चौकशी करून मुदतपूर्व जन्मलेल्या कमी वजनाच्या नवजात शिशुंसाठी नित्तांत आवश्यक असणारी बेबी वॉर्म मशीन राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ५ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई